Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 591 – 596

DOI: 10.5281/zenodo.10258896

Original Research Article

# महात्मा गांधीजी आणि सर्वोदय

प्रा. डॉ. पवार अविनाश विलासराव

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: pavinash83@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

महात्मा गांधीजींचा यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. महात्मा गांधींचे विचार आजही खूप महत्त्वाचे आणि अनेक प्रश्नांची सोडवणूक करणारे आहेत. महात्मा गांधीजींचे विचार राष्ट्रवाद, नैतिकता आणि मानवतावादावर आधारित आहे. त्यांच्या मते, ज्या अर्थकारणाला नीतिशास्त्राचा पाया नसेल तर ते अर्थकारण विनाशकारी ठरेल. नितीशास्त्राचा आधार नसलेल्या या अर्थकारणामुळे सर्वसामान्य लोकांचे हित होणार नाही तर त्यांचे शोषण होईल. समाजात विषमता वाढेल. त्यासाठी नफा आणि पैसा याला महत्त्व न देता मानव केंद्रित अर्थव्यवस्था असावी असा गांधींचा आग्रह होता. गरीब, दुर्बल वर्गाचा बळी देऊन त्यांचे शोषण करून सबल, धनसंपन्न व्यक्तीला द्रव्य संचय करण्यास समर्थ बनविणाऱ्या अर्थशास्त्राला गांधीजींचा विरोध होता. दारिद्र्य बेकारी विषमता शोषण या समस्या सोडवण्यास प्राधान्य देऊन प्रत्येक माणसाला जगण्यायोग्य परिस्थिती निर्माण करणे हे महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराचे उदिष्ट होते. सध्याच्या जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या या युगामध्ये दारिद्र्य, बेकारी, विषमता, शोषण या समस्या फार मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत. भांडवलशाहीमुळे आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे समाजामध्ये असंतोष पसरलेला दिसून येतो. आरक्षणासाठी आंदोलने होत आहेत. उत्पादनाच्या साधने काही मूठभर लोकांच्या हाती असुन समाजातील बहुसंख्य लोक त्यापासून वंचित आहेत. भारतात मागील पाच वर्षात दीड लाख पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यावरून समाजात आर्थिक विषमता किती आहे हे समजते. त्याचबरोबर जगण्यायोग्य परिस्थिती राहिली नाही हे लक्षात येते. वाढती भाववाढ, रुपयाचे अवमूल्यन, बेरोजगारी, वाढते शहरीकरण, औद्योगिक असंतुलन यासारख्या अनेक समस्या या मुक्त अर्थव्यवस्थेतून निर्माण झालेल्या दिसतात. समाजात सामाजिक आणि आर्थिक असंतुलनाचे प्रमाण खूप वाढले आहे. सध्याची अर्थनीती हे न्यायाची राहिली नाही. गांधीजींना न्यायाचे अर्थशास्त्र हवे होते. गांधीजींच्या मते राजकीय व

सामाजिक दुःखावर सर्वोदय हा एक रामबाण औषध आहे. गांधींजींची सर्वोदय संकल्पना काय आहे. आणि वर्तमान काळात सर्वोदयाचा विचार समाजाला उपयोगी आहे का? याचे विश्लेषण या शोधनिबंधामध्ये केलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. महात्मा गांधींजींची सर्वोदय संकल्पना समजून घेणे.
२. सद्य स्थितीत महात्मा गांधीजींचा सर्वोदयाचा विचार कसे उपयोगी आहेत ते अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

१. सर्वोदय नैतिकता आणि मानवतावादावर आधारित आहेत.
२. वर्तमान काळात महात्मा गांधीजींचा सर्वोदयाचा विचार अनेक प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, संशोधन लेख इत्यादीचा आधार घेतला आहे.

**विषय विवेचन**

महात्मा गांधी हे अध्यात्मिक विचाराचे होते. त्यांच्या वर जैन, बौद्ध धर्म व गीता हा धर्मग्रंथ याचा प्रभाव होता. यांच्या एकत्रीत परिणामातुन सर्वोदय हा विचार गांधींच्या मनांमध्ये सुरुवातीपासून होता. पण जॉन रस्किन यांचा “Unto This Last” हा ग्रंथाचे गांधीजींनी अध्ययन केले. जॉन रस्किन च्या या ग्रंथाचा गांधीजींवर खूप प्रभाव पडला. या पुस्तकाचे गुजराती भाषेत “सर्वोदय” हे शीर्षक देऊन भाषांतर केले. महात्मा गांधींजींची सर्वोदय संकल्पना समजून घेऊ.

**सर्वोदयाचा अर्थ**

सर्वोदय हा शब्द सर्व आणि उदय या दोन शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ सर्वांचा उदय किंवा सर्वांचे कल्याण किंवा सर्वांचा विकास असा होतो. सर्वोदय या संकल्पनेच्या माध्यमातून गांधीजींना सर्व व्यक्तींचे कल्याण अपेक्षित आहे. महात्मा गांधी यांची सर्वोदयाची कल्पना कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय सर्वांच्या कल्याणाशी संबंधित आहे. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणापासूनच संपूर्ण समाजाचे कल्याण होते. कारण प्रत्येक व्यक्तीचे कल्याण म्हणजे समाजातील सर्व लोकांचे कल्याण होय. सर्वोदयाचा अर्थ सर्वांचा उदय, सर्वांचा उत्कर्ष, सर्वांचा विकास असा आहे. संस्कृत श्लोक “सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत्।। अर्थात सर्व सुखी होवोत, सर्व रोगमुक्त राहो, सर्वजण चांगल्या, मंगल घटनांचे साक्षिदार बनो, आणि कोणाच्या वाट्याला दुःख ना यावं अशा या भावने प्रमाणे सर्वोदयाची संकल्पना अर्थ आहे. एक साथ सर्वांचा समान रूपाने विकास होणे उदय होणे कल्याण होणे हाच सर्वोदय उद्देश आहे. राजा असो किंवा शेतकरी, श्रीमंत असो किंवा गरीब, हिंदू असो किंवा मुसलमान, संत असो किंवा पापी हे सर्व एकसमान असून एक गट दुसऱ्या गटाचा शोषण करणार नाही अशा वर्गविरहित समाजाची निर्मिती गांधीजींना अपेक्षित आहे. गांधीजींच्या सर्वोदयाची संकल्पना ही मार्क्सच्या समाजवादाच्या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. मार्क्स वादात भांडवलदार कडून कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण केल्यानंतर भांडवलदार व कामगार या दोन वर्गात वर्ग संघर्ष होऊन हा वर्ग संघर्ष पराकोटीला जाऊन कामगार वर्गाकडून हिंसक क्रांतीतून भांडवलशाहीचा अंत होऊन

कामगारांचे कल्याण करणाऱ्या वर्गविरहित समाजवादी अर्थव्यस्थेचा उदय होतो. अशी मार्क्सवादी विचारधारा सांगते. परंतू महात्मा गांधींची सर्वोदय अर्थव्यवस्था ही समाजवादी अर्थव्यवस्थेच्या विपरीत असून यामध्ये वर्ग संघर्ष न करता वर्गांमध्ये समायोजन करून सहकार्य केले जाते. येथे श्रीमंत वर्गाचा नाश न करता या श्रीमंत वर्गाला सत्य अहिंसा प्रेम या आधारे त्यांचे हृदय परिवर्तन करून त्यांची संपत्ती सामाजिक कल्याणासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये वाटली जाते अशा प्रकारे या विचारधारेतून एका वर्गाचे नाही तर सर्व समाजाचे कल्याण होते ही विचारधारा नैतिक आणि अध्यात्मिक क्रांतीतून शांतीमय समाजाच्या पुनर्निर्माण च्या कार्याशी संबंधित आहे. गांधीजींची सर्वोदयाची कल्पना चांगल्या कल्पनेचा स्वीकार करून वाईटाचा त्याग केलेला आहे गांधींच्या मते सरोदयामुळे आर्थिक स्थान मानवी मूल्य विश्वास आणि समाजाची वागणूक यात अमलाग्र बदल करता येतो. गांधींच्या मते सर्वोदय कल्पनेत सामाजिक राजकीय बाजूचा अभ्यास असून ही कल्पना भारतीय संस्कृती आणि भारतीयांचे जीवन आदर्श बनविणारी आहे म्हणजे सर्वांचे कल्याण साधनारी किंवा सर्वांना पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा मिळवून देण्याची यात खात्री आहे.

**सर्वोदय संकल्पनेतील मुळ सिध्दांत**

**१. सर्व लोकांच्या कल्याणात आपले कल्याण समाविष्ट असते**

मनुष्य समाजाचा सदस्य आहे समाजाचे किंवा सर्वांचे कल्याण म्हणजेच त्या व्यक्तीचे कल्याण होय. समाजापासून दूर राहून कोणत्याही प्रकारचे कल्याण साधता येत नाही.

**२. बौद्धिक आणि शारीरिक कार्याची किंमत एकसमान**

महात्मा गांधीजींच्या मते सर्व नागरिकांना समान आदर दिला गेला पाहिजे. बौद्धिक काम असो किंवा शारीरिक काम असो त्यांना कार्याचा मोबदला समान दिला गेला पाहिजे. कोणत्याही कामाला श्रेष्ठ कनिष्ठ समजु नये. घरकाम करणारी व्यक्ती आणि वकील याचे काम सुद्धा समान समजून दोघांच्याही कार्याची मूल्य समान असले पाहिजे भेदभावानुसार मोबदला दिला जाऊ नये.

**३. श्रमप्रधान जीवन हेच खरे जीवन आहे**

यांच्या मते शारीरिक कष्ट करणारे जीवन हेच खरे जीवन आहे. शेतमजुर व हस्तकला व्यवस्थापक यांचे जीवन ही खरे जीवन आहे.गांधीजींचा यांत्रीकीकरणाला विरोध नव्हता तर त्यांचे असे मत होते की ज्या यंत्राच्या वापरामुळे बेकारी वाढत असेल तर ते यंत्र उपयोगाची नाहीत. त्यांच्या मते श्रमप्रधान जीवन हेच खरे जीवन आहे.

**४. सर्वोदय या संकल्पनेत प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी समान संधी असते**

**सर्वोदयाचा आध्यात्मिक आधार**

महात्मा गांधींच्या मते व्यक्तीच्या दुःखाचे मूळ त्याच्या स्वार्थी व लोभी वृत्तीत आहे. स्वार्थ व लोभामुळे मानवी जीवनात हिंसेचे प्रमाण वाढून अन्याय अत्याचार शोषण होत आहे.आणि यातूनच विषमता वाढत आहे. यातून मानवी समाजाची सुटका करायची असेल तर मानवास नैतिकतेचे संस्कार होणे गरजेचे आहे. तेच सर्वोदयाची साधने असुन त्यांना सर्वोदयाचा आध्यात्मिक आधार देखील म्हटले जाते.

**१. सत्य**

सत्य याचा अर्थ अस्तित्व असा होतो. म्हणजे सत्याशिवाय दुसरे काहिच असू शकत नाही. मानवाचे अस्तित्व शुद्ध पवित्र नैतिकतेला धरून असावे.सर्वोदय समाजातील व्यक्ती सत्यवान असला पाहिजे तेव्हाच सर्वांचे कल्याण, सर्वांचा विकास,उदय होऊ शकतो. परमेश्वर सत्य आहे यापेक्षा सत्य ही परमेश्वर आहे असे महात्मा गांधींचे मत होते.

**२. अहिंसा**

महात्मा गांधीजींच्या मते प्रत्येक प्राण्यांवर प्रेम करणे ही अहिंसा आहे. कोणत्याही संजीव प्राण्याला शारीरिक किंवा मानसिक कष्ट न देणेही अहिंसा आहे.अहिंसा या साधनांच्या सहाय्याने सर्वोदयासाठी आवश्यक व्यक्ती कल्याणाकडे अग्रेसर होता येते.

**३. ब्रह्मचर्य**

एकाच वेळी सर्व इंद्रियांवर नियंत्रण ठेवण्याच्या अभ्यासातून काम विकारांवर नियंत्रण ठेवता येते.

**४. अस्वाद**

साध्या व संयमी जीवनासाठी जीभेचा नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**५. अस्तेय**

अस्तेय यांचा अर्थ चोरी न करणे असा होतो. परंतु गांधीजींनी अस्तेय शब्दाचा व्यापक अर्थ घेतला आहे.

त्यांच्या मते कष्ट न करता संपत्तीचा उपभोग घेणे, संपत्तीचा संग्रह करणे त्याचा अनावश्यक उपभोग घेणे आणि वस्तूचा वाजवीपेक्षा जास्त वापर करणे हे अस्तेय आहे.

**६. अपरिग्रह**

सर्वोदयासाठी अपरिग्रह हे महत्त्वाचे व्रत असून अपरिग्रह चा अर्थ संग्रह न करणे असा होतो. आपणास जेवढी आवश्यकता आहे. तेवढ्याच वस्तू आपल्याकडे ठेवले पाहिजे आणि उर्वरित इतरांसाठी ठेवून आपण सरळ साधे जीवन जगले पाहिजे.

**७. अभय**

अभय म्हणजे सर्व प्रकारच्या भयापासून मुक्ती होय. सत्यवान व्यक्ती निर्भय असते. भ्याड व्यक्ती सत्यनिष्ठ असू शकत नाही.

**८. स्वदेशी**

सर्व प्रकारच्या बाह्य संबंधातून मुक्ती म्हणजे स्वदेशी होय.

**९. शारीरिक श्रम**

स्वतः च्या भाकरी साठी प्रत्येकाने कष्ट केले पाहिजे.शारिरीक श्रम हेच खरे जीवन असुन त्यातुनच कल्याण प्राप्त होते.

**१०. सर्वधर्मसमभाव**

सर्व धर्माला समान लेखले पाहिजे. याला सहिष्णुता म्हणतात.

**११. स्पर्श भावना**

श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव करू नये.

सर्वोदय समाजासाठी वरील गुण आवश्यक आहेत.

**सर्वोदय समाजाचे स्वरूप**

सर्वोदय समाजामध्ये सर्वांचं कल्याण हित सत्य आणि अहिंसा च्या आधारे साधले जात असल्याने स्वतः वर स्वतः चे नियंत्रण असेल म्हणून व्यक्तीवर शासनाचे नियंत्रण ठेवण्याची गरज नाही त्यामुळे सर्वोदयामध्ये राज्य मुक्त समाज असेल. आपण पाहतो की राजकीय पक्ष सत्तेवर येण्यासाठी भ्रष्टाचार, किंवा इतर कोणत्याही प्रकारची वाईट कृती करून संपत्ती कमवित आहेत.त्यामुळे समाजात आर्थिक व सामाजीक विषमता वाढत आहे. सर्वोदय समाजात गांधीजींनी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाचे समर्थन केले आहे. ग्राम स्वराज्य च्या स्थापनेतुन सर्वोदय समाजाची स्थापना होऊ शकते. ग्राम स्वराज्य हे असे साधन आहे की त्याद्वारे सर्वोदय समाज निर्माण होतो. सर्वांचे कल्याण होते.

अशा प्रकारे गांधीजींची सर्वोदय संकल्पना असून सध्या जी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण एका विशिष्ट वर्गाकडे होऊन सर्वसामान्य लोक, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे शोषण या भांडवलशाली अर्थव्यवस्थेमध्ये होत आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे, सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण होत नाही. त्यामुळे सामाजिक न्याय समता राहिली नाही. भष्टाचार वाढत आहे.लोक स्वार्थी व लोभी दिसत आहेत.नैतिकता मानवतेवरचा लोकांचा विश्वास राहिला नाही. अन्याय अत्याचार वाढत आहे.अशा या परिस्थितीत गांधीजींच्या सर्वोदयाची संकल्पना महत्वाची वाटते. सर्वोदय ही एक आदर्श संकल्पना आहे.जी सत्य व अहिंसा च्या आधारे संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी महत्वाची आहे. सर्वोदयासाठी आवश्यक असणाऱ्या सद्गुणांच्या माध्यमातून सर्वोदय समाजाद्वारे सर्व समस्या सोडविल्या जाऊ शकतात.पण प्रत्यक्षात यांची अंमलबजावणी करणं शक्य नाही.पण समाजामध्ये काही प्रमाणात सर्वोदयाच्या साधनांचा प्रसार केला तर वरील समस्यांची तीव्रता निश्चित कमी करता येऊ शकते त्यासाठी ग्राम स्वराज्य व उद्योगाच्या विकेंद्रीकरणाची आणि श्रमप्रधान तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

**सारांश**

सध्याच्या या जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण च्या युगात भांडवलशाहीमुळे आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेकारी, शोषण, वाढती भाववाढ, रुपयाचे अवमूल्यन, बेरोजगारी, वाढते शहरीकरण, भष्टाचार, औद्योगिक असंतुलन फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे समाजामध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष पसरलेला दिसून येतो. मुठभर व्यक्तींच्या

हातात संपत्तीचे केंद्रीकरण होत. त्यामुळे सर्वांचे कल्याण होणे आवश्यक आहे. सर्वांचे कल्याण, सर्वांचा उदय सर्वोदयातुन निश्चित होईल पण सर्वोदय साठी जी साधने लागतात व सर्वोदयाची अंमलबजावणी करणं प्रत्यक्षात शक्य नाही पण काही प्रमाणात सर्वोदयाच्या साधनांवर काम केल्यावर वरील समस्यांची तीव्रता कमी ह आणि सामाजिक न्याय व समता होण्यास मदत होईल.

## संदर्भ सूची


१. प्रा. डॉ. ए. आर. रायखेलकर - आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

२. सर्वोदय संक्षिप्त, गांधीजी, सम्पादक भारतन् कुमारप्पा, नवजीवन प्रकाशन मन्दिर, अहमदाबाद.

३. प्रा. डॉ. जी. व्ही चव्हाण, माधव हाळदेकर – आर्थिक विचारांचा इतिहास

४. https://www.mkgandhi.org/ebks/hindi_ebooks.html

५. https://mr.vikaspedia.in/social-welfare/93893e92e93e91c93f915-93890291593294d92a92893e-935-93890291c94d91e93e/93893094d93594b92692f

६. https://shiftindia.com/special-report/2021/10/02/relevance-of-gandhis-economic-ideas/

७. Relevance of Gandhian Thoughts at Present Era, chief Editor Mr.S.G.Talnikar, Academic Book Publications, Jalgaon.

८. https://www.researchgate.net/publication/352362346_gandhiji_ka_sarvodaya_darsana_eka_vicara_drsti_Sarvodaya_Philosophy_of_Gandhi_ji_An_Idea

९. https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&opi=89978449&url=https://www.allstudyjournal.com/article/381/2-4-84-458.pdf&ved=2ahUKEwiIqM_V74GCAxVWNd4KHZksC9w4ChAWegQIAxAB&usg=AOvVaw0BoCXOZhZ9YstUGXxvs2uC